# महाराष्ट्र राज्य काजू परिषद

वेंगुर्ला. जि. सिंधुदुर्ग

Reg.No.U85499MH2024NPL420216

जा. क्र. काजू मंडळ/प्रकल्प/ का.यो / १२ /२०२४ दि. ३० /०८/२०२४

**वाचले-** १) शासन निर्णय क्र. काजूमं-०९२४/ प्र.क्र.६८/ २१- स दि. ०९/७/२०२४ रोजीचे पत्र.

२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.काजू मंडळ/प्रकल्प/का.यो/ १४७०/ २०२४ दि. १९/७/२०२४

## परिपत्रक

**विषय: राज्यातील काजू उत्पादक शेतक-यांना काजू बी साठी शासन अनुदान देणेबाबत मुदतवाढ....**

राज्य शासनाने दि. ९/०७/२०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना उचित किंमत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सन २०२४ च्या काजू हंगामासाठी काजू बी साठी प्रति किलो १० रु. अनुदान जाहीर केलेले आहे. सदरच्या योजने अंतर्गत अनुदान प्रस्ताव दि. ३१/०८/२०२४ पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. आता सदरच्या योजने अंतर्गत काजू बी अनुदान प्रस्ताव सादर करण्यास **दि. ३०/०९/२०२४** पर्यंत **मुदतवाढ** देण्यात येत आहे.

राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना काजू बी साठी शासन अनुदान देणे या योजनेची अंमलबजावणी बाबतची प्रक्रिया पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(संजय कदम)

**मुख्य कार्यकारी संचालक**

**प्रत —**

१. मा. कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहीती व कार्यवाहीस्तव सादर
२. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहीती व कार्यवाहीस्तव सादर
३. विभागीय उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, (सर्व विभाग) व उपविभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य काजू मंडळ, (चंदगड,सिंधुदुर्ग,रत्नागिरी) - आपणास कळविणेत येते की, सदर योजनेच्या मुदतवाढीची प्रसिद्धी स्थानिक वृत्तपत्रामध्ये आपल्या स्तरावर तातडीने प्रसिद्ध करावी.

# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

प्लॉट नं. आर. ७, छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
पोस्ट बॉक्स : १४०७, फॅक्स : नं. : ९१-२०-२४५२८२९९
© ०२०-२४५२८१००, २४५२८२०० ● E-MAIL : admin@msamb.com
Web Site : www.msamb.com


जा. क्र. काजू मंडळ/प्रकल्प/ का.यो /१४८०/२०२४ दि. १९ /०७/२०२४

**परिपत्रक**

**विषय: राज्यातील काजू उत्पादक शेतक-यांना काजू बी साठी शासन अनुदान देणेबाबत....**

**संदर्भ:** शासन निर्णय क्र. काजूमं-०९२४/ प्र.क्र.६८/ २१- स दि. ०९/७/२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबतचे राज्य शासनाने दि. ९/०७/२०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार राज्यातील काजू उत्पादक शेतक-यांच्या काजू बी साठी प्रती किलो १० रु. प्रमाणे अनुदान योजना घोषीत केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये काजू पिकाखालील क्षेत्र सुमारे १९१ लाख हेक्टर असून त्यापासून सुमारे १.८१ लाख मे. टन उत्पादन मिळते. विशेष म्हणजे देशामध्ये महाराष्ट्राची काजू उत्पादकता सर्वात जास्त म्हणजे ९८२ किलो/हेक्टर आहे. महाराष्ट्रात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, कोल्हापूर व पालघर या जिल्ह्यांमध्ये काजूचे पीक प्रामुख्याने घेतले जाते. महाराष्ट्रातील काजूची गुणवत्ता सर्वोत्तम असून, त्यामध्ये फॅटचे प्रमाण अतिशय कमी आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला काजूला भौगोलिक मानांकन प्राप्त झालेले आहे.

२/ महाराष्ट्रातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना उचित किंमत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विविध उपाय/योजना करण्यासंदर्भात बैठका आयोजित करुन याबाबत सर्वांकष चर्चा करण्यात आली. त्यामुळे राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना काजू बी साठी शासनाकडून वित्तीय सहाय्य उपलब्ध करुन दिल्यास, काजू उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यास मदत होईल. ही बाब विचारात घेऊन, सन २०२४ च्या काजू हंगामासाठी काजू बी साठी प्रति किलो शासन अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून शासनाने खालील प्रमाणे राज्यातील काजू उत्पादक शेतक-यांना प्रती किलो १० रु. अनुदान लागू करण्यात आलेले आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची नियुक्ती केलेली आहे.

३/ राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना शासन अनुदान देणे या योजनेची अंमलबजावणी बाबतची प्रक्रिया स्वतंत्रपणे पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर योजनेची जाहीरात व प्रसिद्धी स्थानिक वृत्तपत्रामध्ये आपल्या स्तरावर प्रसिद्ध करण्यात यावी.सोबत योजनेचा तपशील जोडण्यात आलेला आहे.

(संजय कदम)
**मुख्य कार्यकारी संचालक**
महाराष्ट्र राज्य काजू मंडळ, पुणे

**प्रत — सविनय सादर**

१. मा. कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. विभागीय उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, (सर्व विभाग)
४. उपविभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य काजू मंडळ, (सर्व विभाग)

## राज्यातील काजु उत्पादक शेतक-यांना काजू बी साठी शासन अनुदान योजना

**मार्गदर्शक सुचना**

*** वरील कागदपत्रे हे कलरफोटो प्रत (ColourPhoto Print) स्वत: प्रमाणीत (SelfAttested) करुन जोडण्यात यावी

किंवा

***सदरची कागदपत्रे फोटोकॉपी प्रत जोडणार असल्यास योग्य त्या सक्षम अधिकारी किंवा एजन्सी (Competent Authority) कडुन प्रमाणीत(Attested) करुन जोडण्यात याव्यात. प्रस्ताव दोन प्रती मध्ये सादर करावा.

***अनुदान शासनाकडुन प्राप्त झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

**१. योजनेचे स्वरुप –**

(१) काजू झाडापासून प्रति झाड सरासरी १० किलो काजू बी गृहित धरण्यात येईल

(२) काजू बी साठी प्रति किलो रु.१०/-

(३) किमान ५० किलो व कमाल २००० किलो या मर्यादेत.

**२. योजनेचे लाभार्थी - राज्यातील काजू उत्पादक शेतकरी**

**३. योजनेची अंमलबजावणी - नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य काजू मंडळ.**

**४. योजनेच्या अटी व शर्ती-:**

(१) महाराष्ट्रातील काजू उत्पादक शेतकरी पात्र असतील.

(२) ७/१२ वर काजू लागवडीखालील क्षेत्र/झाडांची नोंद असणे आवश्यक आहे.

(३) काजूच्या झाडांची संख्या व त्यापासून झालेले उत्पादन कृषि विभागाच्या संबंधित अधिका-यांनी प्रमाणित करावे.

(४) संबंधित कृषी अधिकारी यांनी संबंधित शेतकऱ्याचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, काजू लागवडीखालील क्षेत्र, काजूच्या उत्पादनक्षम झाडांची संख्या व त्यापासून मिळालेले उत्पादन व आधार संलग्नित बँक खात्याचा क्रमांक इ. तपशीलाची नोंद घ्यावी.

(५) काजू उत्पादक शेतक-यांनी राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीकडील नोंदणीकृत परवानाधारक काजू व्यापारी, नोंदणीकृत सहकारी संस्था, खरेदी-विक्री संघ व नोंदणीकृत काजू प्रक्रियादार यांच्याकडे काजू बी ची विक्री करणे आवश्यक आहे.

(६) काजू उत्पादक शेतकऱ्याने विक्री केलेल्या काजूच्या विक्री पावतीवर उपरोक्त नमूद नोंदणीकृत खरेदीदाराचा जीएसटी क्रमांक, शेतकऱ्याचे संपूर्ण नाव, पत्ता असणे आवश्यक राहील.

(७) सदर योजनेच्या लाभासाठी काजू उत्पादक शेतकऱ्यांनी काजू बी विक्री पावती, ७/१२ उतारा, आधार संलग्नित बचत बँक खात्याचा क्रमांकासह तपशील, संबंधित शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षम काजूच्या झाडांची संख्या व त्यापासून झालेले उत्पादन याबाबत संबंधित कृषि विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र इ. तपशीलासह काजू मंडळाकडे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

(८) कोकणातील व कोल्हापूर जिल्ह्यामधील संबंधित काजू उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांचे अर्ज महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या मुख्य/विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत. अन्य भागातील काजू उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांचे अर्ज महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत. या दोन्ही कार्यालयांनी

प्राप्त अर्ज महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावेत .

(९) पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यावर शासन अनुदानाची रक्कम महाराष्ट्र राज्य काजू मंडळामार्फत थेट जमा करण्यात येईल

५. **योजनेचा कालावधी-** सदर योजना सन २०२४ च्या काजू फळ पिकाच्या हंगामासाठी लागू राहील.

६. **प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख -** ३१/०८/२०२४

**राज्यातील काजु उत्पादक शेतक-यांना काजू बी साठी शासन अनुदान योजना अंतर्गत करावयाचा विहीत नमुन्यातील मागणी अर्ज**

**प्रति,**
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य काजु मंडळ,

**तातपुरता पत्ता** — महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,
प्लाट नं आर ७, मार्केट यार्ड, गुलटेकडी,
पुणे-३७
फोन नं – ०२०-२४५२८१००, ०२०-२४५२८२००

**महोदय,**

राज्यातील काजु उत्पादक शेतक-यांना काजू बी साठी शासन अनुदान देणे या योजने अंतर्गत अनुदान मिळण्यासाठी सादर करत आहे. या अर्जा नुसार आवश्यक ती कागदपत्र सादर करण्यात येत आहे. आपणास विनंती करण्यात येते की नियमानुसार अनुदान मिळावे.

**काजु बी अनुदान मागणी अर्ज**

| अ.क्र | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | **काजु उत्पादक शेतक-यांचा तपशील** | |
| | १. अ.अर्जदार शेतक-याचे नाव | |
| | २. पत्ता | **पत्ता- मुक्काम**<br>**पोस्ट**<br>**तालुका**<br>**जिल्हा**<br>**पिनकोड**<br>**संपर्क क्र.**<br>**ईमेल** |
| | ३. मोबाईल क्रमांक | |
| | ४. आधार कार्ड नंबर | |
| २. | **काजु फळबागेचा तपशील** | |
| | १. काजु लागवडी खालील सर्व्हे नंबर निहाय क्षेत्र व एकुण क्षेत्र | |
| | २. झाडांची संख्या | |
| | ३. उत्पादनक्षम झाडांची संख्या | |

| अ.क्र | तपशील | माहिती |
|---|---|---|
| | ४. चालु वर्षी प्राप्त उत्पादन (किलो ग्रॅम) | |
| | | |
| ३. | **काजु बी विक्रीचा तपशील** | |
| | १. विक्री केलेली काजु बी (किलो मध्ये) | |
| | २. प्राप्त दर (रु./ प्रति किलो) | |
| | ३. एकुण प्राप्त उत्पन्न रु. | |
| | ४. विक्री पावती<br>**(सन २०२४ च्या काजू फळ पीकाच्या हंगामासाठी)** | |
| | | |
| ४. | **काजु खरेदीदाराचा तपशील** | |
| | १. खरेदीदाराचे नाव / फर्मचे नाव | |
| | २. बाजार समितीचा परवाना धारक आहे काय? | |
| | ३. असल्यास बाजार समितीचे नाव व परवाना क्रमांक | |
| | ४. GST क्रमांक | |
| | | |
| ५. | **बँक खात्याचा तपशील** | |
| | १. बँकेचे नाव | |
| | २. शाखा | |
| | ३. खाते नंबर | |
| | ४. खाते प्रकार (Savings/Current) | |
| | ५. IFSC कोड | |
| | ६. MIRC कोड | |
| | | |
| ६. | **आवश्यक कागदपत्रे** | |
| | १) पत्ता पुरावा (रेशन कार्ड/आधार कार्ड /इतर) | होय / नाही |
| | २) आधार कार्ड झेरॉक्स | होय / नाही |
| | ३) ७/१२ उतारा | होय / नाही |
| | ४) इतर सह हिस्सेदार यांचे संमती पत्र (१०० रु. स्टॅम्प वर) | होय / नाही |
| | ५) विक्री पावती | होय / नाही |
| | ६) कॅन्सल चेक सही / अथवा पासबुक झेरॉक्स | होय / नाही |
| | ७) कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र | होय / नाही |

उपरोक्त माहिती विचारात घेता अनुज्ञेय मापदंडनुसार अनुदान मिळणेस विनंती आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेली माहिती वस्तुस्थिती वर आधारीत असुन खरी असल्याचे मी प्रमाणीत करत आहे.

**स्वाक्षरी**

**स्थळ**

**दिनांक**

**अर्जदाराचे नाव** ____________________

पत्ता- मुक्काम

पोस्ट

तालुका

जिल्हा

संपर्क क्र. ______________________

## कृषि खात्याचा प्रमाणित दाखला

### राज्यातील काजु उत्पादक शेतक-यांना काजू बी साठी शासन अनुदान देणे

**१. लाभार्थ्याचे नाव**

**२. पत्ता-** मुक्काम

पोस्ट

तालुका

जिल्हा

संपर्क क्र.

ई-मेल –

**३. बँक खात्याचा तपशील**

| | |
|---|---|
| १. बँकेचे नाव | |
| २. शाखा- | |
| ३. खाते क्रमांक | |
| ४. खाते प्रकार (Savings/Current) | |
| ५. IFSC कोड | |
| ६. MIRC कोड | |

**४. प्रत्यक्ष पाहणी अहवाल**

| अ.क्र. | ७/१२ तपशील | एकुण काजू क्षेत्र | ७/१२ नुसार एकुण झाडांची संख्या | प्रत्यक्ष मोका तपासणीनुसार उत्पादनक्षम झाडांची संख्या | उत्पादनक्षम झाडापासुन मिळालेले एकुण काजू बी उत्पादन (किलो) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| एकुण | | | | | |

प्रमाणित करणेत येते की श्री.................................... मुक्काम -.............. पोस्ट-........... तालुका.............जिल्हा...............यांनी राज्यातील काजु उत्पादक शेतक-यांना काजू बी साठी शासन अनुदान देणे या योजनेंतर्गत अर्ज केलेला असुन मोका तपासणीनुसार लाभार्थाचे काजू फळपिका खालील

एकुण क्षेत्र ......एवढे आहे. सदरच्या क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण उत्पादनक्षम काजू झाडांची संख्या......... एवढी असुन सन २०२४ मध्ये...... किलो काजू बी चे उत्पादन प्राप्त झाले आहे.

**सोबत** – काजू झाडांची नोंद असलेला ७/१२ दाखला

**स्वाक्षरी**

**स्थळ**

**दिनांक**

**मोका तपासणी अधिकाऱ्याचे नाव**________________

**पदनाम –**

**(जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/**
**तालुका कृषि अधिकारी/**
**कृषि सहाय्यक)**

**गाव/तालुका/जिल्हा -**

प्रपत्र १

| काजू उत्पादक शेतक-याने पुर्तता करावयाचे आवश्यक कागदपत्रे | | |
|---|---|---|
| | प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार आवश्यक बाबी | शेरा (होय / नाही) |
| १. | पत्ता - पुरावा | |
| २. | आधार कार्ड झेरॉक्स | |
| ३. | ७/१२ उतारा | |
| ४. | इतर सह हिस्सेदार यांचे संमती पत्र (१०० रु. स्टॅम्प पेपरवर) | |
| ५. | विक्री पावती | |
| ६. | कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र | |
| ७. | कॅन्सल चेक सही / अथवा पासबुक झेरॉक्स | |

स्वाक्षरी

स्थळ

दिनांक

अर्जदाराचे नाव ____________________

पत्ता- मुक्काम

पोस्ट

तालुका

जिल्हा

संपर्क क्र. ______________________

प्रपत्र - २

# काजु उत्पादक शेतक-याचे स्वंयघोषित प्रमाणपत्र

मी, काजू उत्पादक शेतकरी श्री/सौ..................................... प्रमाणित करतो की, ............................ या गावचा रहिवासी काजु उत्पादक शेतकरी आहे. मी काजु अनुदान मागणी अर्जामध्ये नमुद केलेली खालील माहिती ही खरी असल्याचे मी प्रमाणित करीत आहे.

१. काजु उत्पादक शेतक-यांचा तपशील
२. काजु फळबागेचा तपशील
३. काजु बी विक्रीचा तपशील
४. काजु खरेदीदाराचा तपशील
५. बँक खात्याचा तपशील
६. आवश्यक कागदपत्रे

वरील कागदपत्रांमध्ये तपशीलामध्ये सत्यता दिसुन न आल्यामुळे अनुदानास अपात्र ठरल्यास किंवा अनुदान नामंजुर झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

स्थळ

दिनांक

स्वाक्षरी:-

नाव:-

पदनाम:-

कार्यालयाचे नांव:-

दिनांक :-